● गुरुवार, दि. १६ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १६९ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## मनपाची अतिक्रमण हटाव मोहिम

### भीमराव प्रवेशद्वार ते जय नगरपर्यंत डीपी रोडवरील अतिक्रमण हटवले

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरातील भीम राव प्रवेशद्वार ते जय नगर पर्यंत डीपी रोडवरील अतिक्रमण हटावले आहे आज पासून दोन दिवस अतिक्रमण हटवण्यात सुरुवात करण्यात आली आहे जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम दोन दिवस चालनार असून नागरिकांचे डीपी रोडवर अतिक्रमण झालेली आहे त्या नागरिकांनी मूल्यवान वस्तू काढून सहकार्य करा असे आव्हान जालना महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांनी केले आहे यावेळी जालना महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत जालना महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण जालना महानगरपालिकेचे इंजिनियर साऊद महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक पंडित पवार एस आय अरूण वानखेडे एस आय अशोक लोंढे श्रावण सराटे विलास गावंडे निलेश शंकरपिल्ली हरिण चांदोडे शोएब खान अविनाश सराटे यासह जालना महानगरपालिकेचे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

### अतिक्रमण मोहीम सुरूच राहणार - महापालिकेचे सहाय्यक आयुक्त चव्हाण

जालना शहरातील गांधी चमन ते कचेरी रोडवर अतिक्रमण वाढले असून या रस्त्यावरील अतिक्रमण काढणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे यासह डीपी रोडवरही अतिक्रमण काढणार असल्याचेही माहिती चव्हाण यांनी दिली आहे.

# शहर विद्रुपिकरणाला 'अंकुश' बसेना

## मनपा कारवाईसाठी धजावत का नाही? मालमत्ता विभाग व स्वच्छता निरीक्षकांवर कारवाई शिवाय पर्याय नाही!

**दीपक शेळके**

**जालना** - शहरातील विद्युत खांबे, दुभाजके, दिशादर्शक फलकांसह मुख्य रस्त्यांवर चौका-चौकात आणि म हत्त्वाचे म्हणजेच नुकतेच जिल्हाधिकारी कार्यालय व छत्रपती संभाजी उद्यान जवळ झालेल्या दादर वर जाहीरातबाजींनी आपले घर केले आहे. यामुळे शहर विद्रुपिकरणात भर पडत आहे. जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने दोन दिवसांपुर्वीच अनाधिकृत फलक व विना परवानगी जाहीरात फलकांवर कारवाई करण्यासह गुन्हा दाखल करण्याबाबत जाहिर सुचना काढण्यात आली होती. असे असले तरी हा मालमत्ता विभागाचा केवळ कागदोपत्री कार्यवाही करण्याचा केविलवाणा प्रयत्न असल्याचे शहरातील चित्रावरून स्पष्ट होते आहे. दैनिक युवा आदर्श गेल्या दोन-अडीच वर्षांपासून शहर विद्रुपिकरणाबाबत वृत्त प्रकाशित करत आहे. नगर परिषद असतांनाही मुख्याधिकारी यांनी कारवाई करण्याचे अनेकदा आश्वासन दिले होते. स्वच्छता निरिक्षकांना नोटीसाही काढण्यात आल्या होत्या. मात्र, पुन्हा परिस्थिती जैसे थेच आहे. नगर पालिकेचे रुपांतरण शहर महानगरपालिकेत झाले आहे. तरी देखील अनाधिकृत फलकबाजीवर 'अंकुश' लावण्यास अद्यापही मनपा प्रशासनाला यश आले नाही. मालमत्ता विभाग व स्वच्छता निरीक्षकांवर कारवाई करण्याशिवाय मनपा आयुक्तांकडे आता दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याचे एकंदरीत चित्रावरून स्पष्ट होते आहे. आता मनपा आयुक्त कोणती भुमिका घेणार हे लवकरच दिसून येईल.

शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय, तहसिल, पोलीस ठाणे, मंठा चौफुली ते अंबड चौफुली, अंबड चौफुली ते छत्रपती संभाजी नगर चौफुली, मंठा चौफुली ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व्हाया गुरुबचन चौक, सिंदखेड राजा चौफुली, राजुर रोड, मुख्य बाजार पेठ, मुख्य रस्ते आदी शहरातील सर्वत्र फलकबाजीने शहर विद्रुपिकरणात भर पडत आहे. हे मनपा प्रशासन उघड्या डोळ्याने पाहण्याशिवाय काहीही करत नाही. महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डिफ ेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ च्या कलम ५ अन्वये सार्वजनिक ठिकाणांचे विद्रुपिकरणापासून मोकळे करणे व संबंधीतांवर कारवाई करण्याबाबतचे शासनाचे स्पष्ट आदेश असले तरी जालना शहर मनपाच्या कार्यक्षेत्रात होत असलेली फलकबाजी पाहता विद्रुपिकरण कायद्याचा केवळ जाहीर नोटीस काढण्याव्यतिरिक्त संपुर्णतः विसर मनपा प्रशासनाला पडला कि काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहर विद्रुपिकरणात भर होत असल्यासंदर्भात दैनिक युवा आदर्शने वेळोवेळी वृत्त प्रकाशित केले आहे. त्याची दखल घेत पालिका प्रशासनाने यापुर्वी ते बॅनर हटवले ही होते. त्यावेळी पालिकेचे मुख्याधिकारी हे संतोष खांडेकर हेच होते. सध्या महानगर पालिका असतांना आयुक्त पदाचा भारही त्यांच्यावर आहे. मुख्याधिकारी असतांना श्री खांडेकर यांनी स्वच्छता निरीक्षकांना कारणे दाखवा नोटीसा काढत वेतनवाढ रोखण्यासह विभागीय चौकशीचा प्रस्ताव मा. संचालनालयाकडे पाठविण्याचा दम भरला होता. त्यानंतर शहरातील विविध बॅनर हटले होते. व खांबांसह दुभाजक, दिशादर्शक फलकाने मोकळा श्वास घेतला होता. मात्र, केवळ बॅनर काढण्यावरच पालिका प्रशासनाने त्यावेळी समाधान मानले होते. कोणावरही त्यावेळी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. परिणामी पुन्हा या बॅनरबाजीने बस्तान मांडले आहे.

मनपाने नुकतेच जाहीर नोटीस काढून संबंधित अनाधिकृत फलकबाजी करणाऱ्यावंर कारवाईसह गुन्हे दाखल करणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, ही कारवाई किती दिवसांनंतर, किती महिन्यांनंतर अथवा किती वर्षांनंतर होणार हे मात्र, त्यात स्पष्ट केले नसल्याने अशांवर 'अंकुश' बसत नाही असे दिसते. शहर विद्रुपिकरणाला 'अंकुश' बसत नसला तरी शहर विद्रुपिकरणाला 'अंकुश'च जबाबदार असल्याचे दिसून येत आहे.






जिल्ह्यातील प्रत्येक चौकात मुख्य रस्त्यावंर, मंठा चौफुली ते अंबड चौफुली, मंठा चौफ ुली ते गुरुबचन चौक- छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आदी विविध भागात कोचिंग क्लासेसच्या जाहीरात-फलकबाजी दिसून येत आहे, मनपा प्रशासनाकडून एजन्सीधारकांना जवळपास २५० व खांबांवरील जवळपास ६०-७० परवानगण्या देण्यात आलेल्या असून या एजन्सी धारकांमधूनही अनेक एजन्सीधारकांकडे मनपाची थकबाकी आहे. एकंदरीत तीनशे ते सव्वा तिनशे फलकांना परवानगी असतांना एवढे फलक तर केवळ एकाच कोचिंग क्लासेसचे शहरात आढळून येत आहेत. मनपा या शहर विद्रुपिकरणास 'अंकुश' लावतील का?

### नियमही धाब्यावर...

ज्या एजन्सींना अधिकृत परवानगी देऊन जागा फिक्स करण्यात आल्या आहेत त्या एजन्सी धारकांसाठी रस्त्यावर आडवे-तिरपे असे फलक न लावण्याच्या सूचना आहेत. मात्र, या नियमाचे कोणतेही पालन होतांना दिसून येत नाही.

### लोक आयुक्तांकडे प्रकरण गेल्यानंतरही कारवाई का नाही?

एकीकडे अतिक्रमण काढणासाठी मनपाकडून मोहिम राबविण्यात येत आहे. मात्र, आझाद मैदान परिसरातील एका अतिक्रमण धारकांविरोधात तक्रारदार मनपाकडून कारवाई होत नसल्याचे लक्षात आल्यावर लोक आयुक्तांकडे गेला. मनपा प्रशासनाला अहवाल पाठविण्याच्या सूचना आल्यानंतरही मनपा गप्प का?








बॅनरबाज; पालिकेत हटले, महापालिकेत थाटले !

शहर विद्रुपिकरणात भर; केवळ बॅनर हटवणार की कारवाई करणार?

दीपक शेळके

जालना- शहरात अनाधिकृत बॅनरबाजीमुळे शहर विद्रुपिकरणात भर पडत आहे. शहरातील इलेक्ट्रीसिटीच्या खाबांवर, दुभाजकासह रस्त्यावर दिसते त्या ठिकाणी जाहिरातबाजी होत आहे. औरंगाबाद रोडवरील दिशादर्शक फलकावरही जाहिरातबाजी होत आहे. यापुर्वी नगर पालिकेने कारवाई करत बॅनर हटवले होते. मात्र, आता जालना शहर [illegible]

## शिवसेने जिल्हाप्रमुखपदी विष्णू पाचफुले यांची वर्णी लागण्याची शक्यता

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्हाप्रमुखपदी विष्णू पाचफुले यांची वर्णी लागण्याची शक्यता असल्याची माहिती अधिकृत सुत्रांकडून मिळत आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांनी परतुर मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवत बंडखोरी केल्याने पक्ष श्रेष्टींनी मोहन अग्रवाल यांची पक्षातून हकलपट्टी केली आहे. त्यामुळे मोहन अग्रवाल यांच्या जागेवर शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांची वर्णी लागणार असल्याची शिवसेना वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. यासंदर्भाने शिवसेनेच्या काही कार्यकर्त्यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे तशी मागणी केल्याचीही माहिती पुढे येत आहे. शिवसेनेचे शहरप्रमुख असलेले पाचफ ुले यांनी गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून शाखा प्रमुख ते शहर संघटक व शहर प्रमुख असा पक्षीय कार्यभार सांभाळलेला आहे. तसेच जालना नगर पालिकेत ते नगर सेवक व गटनेता देखील राहीलेले आहेत. सामान्य जनतेच्या प्रश्नांची त्यांना जाण आहे. गोरगरीब नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते नेहेमीच तत्पर असतात. याशिवाय



आ. खोतकर यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणात विष्णु पाचफुले यांचा जालना मनपाचे पहिले महापौर असा उल्लेख करत एक प्रकारे शिवसेनेकडून महापौर पदासाठी विष्णू पाचफुले यांची घोषणा केली आहे. आगामी काळात शिवसेनेच्या जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी ही विष्णु पाचफुले यांच्याकडे येईल अशी आशा पाचफुले समर्थकांमध्ये आहे.

### मनपा कडून अनाधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिमेसाठी दहा पथके

**जालना**- शहरातील विविध भागात अनाधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम राबविण्यात येत आहे. मनपाने यासाठी साई एजन्सीची नेम णूक केली आहे. या मोहिमेसाठी दहा पथके कार्यरत आहेत. एका पथकात चार कर्मचारी आहेत. बुधवारी या पथकाने १८४ घरांचा सर्वे केला आहे. या सर्वेक्षणातील माहिती व कार्यालयातील माहितीनुसार नळ कनेक्शन हे अनाधिकृत आहेत का? हे निश्चित करुन नोटीसा देण्यात येणार आहे. सात दिवसात संबंधितांनी अनधिकृत नळ कनेक्शनची रक्कम भरली नाही तर संबंधितावर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

युवा आदर्श

### मलम ...

हळहळत्यां जखमे
करो जालीम मलम
जपून रहावे कायम
नाराज नको बालम
पाठीशी घाले कुणां
नको कसला संभ्रम
कायद्याच्या जंजाळे
भासे संभोह विभ्रम
मिडिया वाले तय्यार
पसरवायला एकदम
शोधून काढे आरोपी
सतत करुन परिश्रम
तपास यंत्रणा स्वताचं
भोगे कारावास सश्रम
खा शिव्या लोकांच्या
नेहमी तोचि दिनक्रम
निवेदन मोजूनमापून
ठरला असे कार्यक्रम
कोण रे मास्टर माईंड
बुध्दी बनवली चक्रम
नेत्यांना आवडते श्रेय
दाखवी केला विक्रम
तपास आणि पुराव्या
चालत राहे व्यतिक्रम
सोडवा मुख्यसूत्रधार
करू टाकतात निग्रम
चर्चा रंगल्या वांझोटी
चघळत बसे च्युंईंगम्

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# संपादकीय

## वाहतूक कोंडी...

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. शहरातील मध्यभाग, उपनगर, पेठांसह बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी वाढली आहे. या ठिकाणांहून वाहन चालकांना मार्ग काढणे, आणि नागरिकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीने दररोज पुणेकरांना जीव मुठीत धरावा लागत आहे. त्यामुळे पुणेकर अक्षरशः वैतागले असून पुण्यातील या वाहतूक कोंडीत पुणेकरांचा श्वास घुसमटत आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीवर आता जगाने ही शिक्कामोर्तब केले आहे. टॉम टॉम या जागतिक संस्थेने जगातील ६२ देश आणि ५०० शहरांमधील रहदारीची माहिती संकलन करून ट्रॉफीक इंडेक्स २०२४ नावाचा अहवाल सादर केला. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पाच शहरांमध्ये कोलाकोता, बेंगळुरू आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. या अहवालात सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात कोलकाता दुसऱ्या तर पुण्याचा चौथा क्रमांक लागत असल्याचे नमूद केले आहे. जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात पुण्याचा चौथा क्रमांक लागतो ही पुणेकरांसाठी भूषणावह बाब नसून चिंताजनक बाब आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहा किलोमीटरच्या प्रवासासाठी पुणेकरांना ३३ मिनिटे २२ सेकंद लागतात. पुणेकरांचा सर्वाधिक वेळ हा प्रवासातच जातो. पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे वाहनांची बेसुमार वाढती संख्या. एकेकाळी सायकलींचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे दरवर्षी त्यात भरच पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे रस्ते अपुरे पडत आहे. अरुंद रस्ते आणि त्यावर फोफावलेली अतिक्रमणे यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडीत भरच पडत आहे. पुण्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी साधारणपणे एक हजार वाहतूक पोलीस रस्त्यावर असतात. पुणे शहराचा विस्तार मुंबईपेक्षा जास्त आहे. वाहतूक पोलिसांना उपलब्ध मनुष्यबळात काम करावे लागते. वाहतूक कोंडीला पोलिसांना दोषी ठरवले जाते. मात्र यात पोलिसांचा काहीही दोष नाही. पुण्यातील वाहतूक कोंडी रोखायची असेल वाढत्या वाहनांना आळा घालवा लागेल आणि वाढत्या वाहनांना आळा घालायचा असेल तर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. जर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल आणि वाढत्या वाहनांना आळा बसला की वाहतूक कोंडीही कमी होईल आणि वाहतूक कोंडी कमी झाली की पुणेकरांना मोकळा श्वास घेता येईल..

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# किरण कीर्तिकर ठरलाय क्रांतिवीर करंडक २०२५ विजेता

**पनवेल । प्रतिनिधी -** शिवक्रांती सामाजिक संस्था आणि शब्दवाहिनी अॅकॅडमी यांच्या माध्यमातून दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल या ठिकाणी राज्यस्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा अर्थात क्रांतिवीर करंडक २०२५ चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

रायगड ही क्रांतीकारकांची भूमी आहे. याच क्रांतिकारकांच्या वक्तृत्वाने इथल्या मातीचा कायापालट केला. इथं नवचैतन्य निर्माण केलं, याच वक्तृत्वाने तरुणाईला दिशा देण्याचं काम केलं. आणि खऱ्या अर्थाने या मातीला महत्त्व प्राप्त करून दिले. त्याच महापुरुषांच्या विचारांनी आजच्या पिढीने प्रयत्नशील राहावे या उदात्त हेतूने या क्रांतीवीर करंडक २०२५ चे आयोजन करण्यात आले होते.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ श्री. संतोष टकले, श्री.अशोक घुगे- वर्ग १ अधिकारी , ड. छाया म्हात्रे,ड. साहिल मोरे, ड. सुनिल तोटावाड यांच्या मुख्य उपस्थितीत आणि सदिच्छांनी या स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धेसाठी उंच काय : महापुरुषांचे पुतळे की विचार?, आसान नहीं होता... एक प्रतिभाशाली स्त्री से प्रेम करना, गोष्ट आहे पृथ्वी मोलाची., वाढते जागतिकीकरण आणि हरवलेली माणुसकी, बदलत्या राजकरणाची दिशा, बाप माझा शेतकरी... उभ्या जगाचा चाकर..., सोशल मीडियाच्या विळख्यात अडकलेली तरुणाई, हे सात विषय देण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या तब्बल ५४ जणांनी प्रत्यक्ष सहभाग या स्पर्धेमध्ये नोंदवला.

या वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी असे परीक्षण सन्माननीय परीक्षक नावः प्रा.डॉ. संदिप भगवान वाकडे, एस. एम. जोशी कॉलेज हडपसर, पुणे. सहाय्यक प्राध्यापिका सौ. प्रियांका मयुरेश माने - डॉक्टर तात्यासाहेब नातू कला व वरिष्ठ वाणिज्य महाविद्यालय मार्गताम्हाणे. तालुका- चिपळूण जिल्हा-रत्नागिरी आणि प्रा.डॉ.चिंतामण धिंदळे - वीर वाजेकर, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,फुंडे,ता.उरण यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव आणि महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेलचे आदरणीय प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर साहेब, ड. विजय गडगे , ड. शशिकांत मुंडे , ड. विकी दुसिंग, ड. सुयश कामेरकर, ड. मयूर साबळे यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण पार पडले.

निकाल - १. किरण कीर्तिकर - सातारा, २. श्रुती बोरस्ते - नाशिक, ३. तेजस पाटील - कोल्हापूर, ४. उत्तेजनार्थ प्रथम - धर्मेश हिरे - धुळे, ५. उत्तेजनार्थ द्वितीय - मिथुन दत्तात्रय माने - सातारा,

६. उत्तेजनार्थ तृतीय - प्रतीक उत्तमराव पवार - पनवेल, ७. उत्तेजनार्थ १.( उत्कृष्ट- सादरीकरण) - 



हरिभाऊ खरात, ८. उत्तेजनार्थ २.( उत्कृष्ट- सादरीकरण)- उत्कर्ष ठाकूर.

स्पर्धेची सांगता होत असताना ज्यांच्या सौजन्यातून आणि सहकार्यातून ही स्पर्धा यशस्वी होऊ शकली अशा सर्वांचेच आभार मुख्य संयोजक युवा व्याख्याते ड. विवेक भोपी आणि युवा व्याख्याते कु.शैलेश कोंडसकर यांनी मानले. स्पर्धेच्या दिवसभराच्या सूत्रसंचालनाची भूमिका सुजित काळंगे आणि प्रा.निकिता बोथरे या संयोजकांनी पार पाडली. स्पर्धेच्या यशस्वीतेमागे मयूर पावशे,अनिकेत काठे, अविनाश भोईर, अमोल पाटील, रोहित पाटील,यश पाटील, पंकज पांडुळे, विवेक वारभुवन, अभय आळशी, सायली पाटील, विलास गावित यांनी संयोजनाचे मुख्य जबाबदारी पार पाडली.

# ठाकरेंच्या शिवसेनेची परिवहन सेवेत वाढ करण्याची मागणी

**पनवेल । प्रतिनिधी -** पनवेल महानगरपालिका परिसरात सिडकोणे निर्माण केलेले सुमारे अडीच ते तीन लाख लोकसंख्येचे कामोठा आणि तीन ते साडेतीन लाख लोकसंख्येचे कळंबोली शहर आहेत. पनवेल महानगरपालिकेला स्वतःची स्वतंत्र परिवहन व्यवस्था नाही. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन व्यवस्थेवरच या दोन शहरांना अवलंबून राहावे लागते. तरी वाढत्या लोकसंख्येचा विचार करून नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन व्यवस्थेने कामोठे, कळंबोली व परिसरात बस व्यवस्था वाढवावी अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने त्याचप्रमाणे कॉलनी फोरम तर्फे करण्यात येत आहे.

सुमारे पाच ते सहा लाख लोकसंख्या असलेल्या या दोन शहरासाठी फक्त ५६ नंबरची एकच बस सध्या कार्यरत आह तेही फक्त प्रमुख रस्त्यावरूनच धावते. त्यामुळे बस प्रवाशांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागते. सदरची बस फक्त मानसरोवर रेल्वे स्टेशन ने पोलीस स्टेशन मार्गे सरळ येऊन कामोठा ब्रिज पर्यंत धावते. त्यापुढे सरळ हायवेने जाऊन कळंबोली सर्कलला जाते आणि परत कळंबोली शहरातून रोडपाली पोलीस मुख्यालय येथे जाते. यामुळे या बस मार्गाच्या पासून लांब असणार्या सेक्टरमधील रहिवाशांना रिक्षा करून रेल्वे स्टेशनला जावे किंवा स्वतःची बाईक घेऊन रेल्वे स्टेशनला जाणे याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहत नाही. त्यामुळे प्रदूषणही होते आणि स्वतःचा खर्चही वाढतो. तसेच या रूटवरही बसची फ्रिक्वेन्सी एकदम कमी असल्यामुळे, प्रवाशांना त्यांच्या बस स्टॉपवर तसेच मानसरोवर कामोठे रेल्वे स्टेशनच्या बस स्टॉप वर दहा मिनिटांपासून अर्धा तासापर्यंत लाईन मध्ये उभा राहावे लागते. सुधारलेल्या या जगात स्मार्ट सिटी मध्ये बस प्रवाशांना अर्धा अर्धा तास उभा राहण्याएवढी नामुष्की कोणतीही नाही. प्रवाशांची ही अवस्था ध्यानात घेऊन माजी नगरसेविका लीना गरड अध्यक्ष कॉलनी फोरम महानगर संघटिका शिवसेना यांनी कामोठे कॉलनी फोरम आणि कळंबोली कॉलनी फोरमच्या सदस्याला घेऊन प्रतीकात्मक रित्या मानसरोवर स्टेशनला येथुन उभे राहून ५६ नंबर बसणे प्रवास केला. प्रवासांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याने, प्रस्थापित पुढार्यांनी यापूर्वीच यावर मार्ग काढणे अपेक्षित होते. यापुढे कामोठा कळंबोली मध्ये सह्यांची मोहीम राबवून नवी मुंबई महानगरपालिकडे अधिकच्या बसेस सोडण्याचे मागणी करण्यात येणार आहे. तसेच कामोठे शहरात कामोठे पोलीस स्टेशन, ऐश्वर्या हॉटेल, गोकुळ डेअरी, मनमोहन स्वीट असा रिंग रूट मार्गे नवीन बस सोडण्याचीही मागणी करण्यात येणार आहे. तसेच कळंबोली आणि रोडपाली मध्येही अतिरिक्त बस मार्गाची मागणी करण्यात येणार आहे. जेणेकरून बस प्रवाशांचा खर्च कमी होईल आणि त्यांचे जीवन सुसह्य होईल. या प्रतीकात्मक आंदोलनात कामोठे कॉलनी फोरम चे अरुण जाधव, बापू साळुंखे आणि कळंबोली कॉलनी फोरमचे अवधूत साळुंखे, धीरज पवार, रत्नमाला शिंदे इत्यादी सदस्य हजर होते.






# मलाड मस्तीमध्ये रश्मी देसाई, शारिब हाशमी आणि ईशा मालवीय यांची उपस्थिती



मलाड मस्ती २०२५ हा कार्यक्रम अत्यंत खास आणि मनोरंजनाने भरलेला होता, जिथे बॉलिवूड, टीव्ही आणि संगीत क्षेत्रातील अनेक सिताऱ्यांनी आपल्या उपस्थितीने प्रेक्षकांची मने जिंकली. आमदार असलम शेख यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित केला गेला, जिथे मनोरंजन आणि मस्तीचा एक अनोखा संगम पाहायला मिळाला.

डान्सर आणि अभिनेता राघव जुयालने आपल्या खोडकर कृतींनी आणि पब्लिकशी संवाद साधून कार्यक्रमाला ऊर्जा दिली. त्यांनी आपले सीनियर आणि प्रेरणास्थान शारिब हाशमी यांची प्रशंसा केली आणि त्यांच्या संगी चित्रपटाचा प्रचार केला, जो १५ जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. तसेच, त्यांनी किल चित्रपटातील लोकप्रिय संवाद प्रेक्षकांसमोर मजेशीर पद्धतीने सादर केला. शारिब हाशमी यांनी मलाड मस्ती च्या यशस्वी आयोजनाबद्दल असलम शेख यांचे कौतुक केले आणि सांगितले की, ते गेल्या आठ वर्षांपासून या कार्यक्रमाचा भाग आहेत. टीव्ही क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्री रश्मी देसाई यांनी आपला आगामी गुजराती चित्रपट प्रमोट केला, तर ईशा मालवीय यांनी आपल्या शोबद्दल काही मजेशीर किस्से सांगितले.

गायक दिलबाग सिंग, फरहान साबरी, आणि इतर कलाकारांनी त्यांच्या गाण्यांनी या सकाळीला संस्मरणीय बनवले.

मलाड मस्ती चा यशस्वी उपक्रम गोल्ड मेडल कंपनी, ब्राईट आउटडोअर, अपार ॲडव्हर्टायझिंग, आणि क्लाऊड नाईन यांच्या सहकार्याने पार पडला. महेश राव आणि शेखर सिंग यांनी हा कार्यक्रम उत्तम प्रकारे व्यवस्थापित केला. सर्व सेलिब्रिटींनी असलम शेख आणि त्यांच्या टीमचे मनापासून आभार मानले.

# प्लास्टिक सर्जरी शिबिरासाठी रविवारी प्राथमिक तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरात २२ फेब्रुवारी होणाऱ्या भव्य मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे शिबिराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांसाठी महत्त्वाची प्राथमिक तपासणी रविवार दि. १९ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता जालना येथील मिशन हॉस्पिटलमध्ये होणार आहे.


या तपासणीत रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी पात्रता निश्चित केली जाईल. तपासणीदरम्यान रुग्णांच्या समस्येचे निदान करण्यात येईल आणि त्यानुसार त्यांना शिबिरासाठी निवडले जाईल. त्यामुळे ज्या रुग्णांना या शिबिराचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी १९ जानेवारीला तपासणीसाठी उपस्थित राहणे महत्त्वाचे आहे.

गेल्या १९ वर्षांपासून जालना येथे प्लास्टिक सर्जरी शिबिर यशस्वीपणे आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीही मुंबईतील नामांकित प्लास्टिक सर्जन डॉ. अनिल टिबरेवाल आणि त्यांचे सहकारी तज्ज्ञ सर्जन रुग्णांवर मोफत उपचार करतील. शिबिरामध्ये फाटलेले ओठ, तोंड व चेहऱ्याची विकृती, जळीत जखमा, चिकटलेली बोटे, अपघातात झालेल्या जखमा तसेच अन्य जन्मजात विकृती असलेल्या रुग्णांवर उपचार केले जातील.

गरजूंनी प्राथमिक तपासणी करून घ्यावी, असे आवाहन मिशन हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. ख्रीस्टोफर मोजेस, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, सचिव रवी भक्कड, प्रकल्प प्रमुख अभय नानावटी, प्रकल्प सहाय्यक डेव्हिड गायकवाड यांनी केले आहे.

# जवाहर नवोदय विद्यालयाची प्रवेश परीक्षा नियोजनबध्द व शिस्तीत पार पाडावी - जिल्हाधिकारी

## जालना जिल्ह्यातील ३० केंद्रावर एकुण ९ हजार ७६० विद्यार्थी देणार परिक्षा



**जालना । प्रतिनिधी -** केंद्रीय परीक्षा एजन्सीमार्फत आयोजित पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेकरीता जालना जिल्ह्यातील ३० केंद्रावर एकुण ९ हजार ७६० विद्यार्थ्यांची शनिवार, दि. १८ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेच्या कालावधीत परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील प्रवेश परिक्षा नियोजनबध्द व शिस्तीत काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

केंद्रीय परीक्षा एजन्सीमार्फत आयोजित पी. एम. श्री. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या पुर्वनियोजनाच्या अनुषंगाने आज (दि.१५) रोजी जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी बैठकीस अपर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल घुपे, जवाहर नवोदय विद्यालय प्राचार्य श्री. पवार, उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, परीक्षा समन्वयक श्री. आंधळे यांच्यासह सर्व गटशिक्षण अधिकारी, परीक्षा केंद्रप्रमुख आणि केंद्र परीक्षा निरीक्षकांची उपस्थिती होती.

सदरील केंद्रावर पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या विद्यार्थ्यांची कसुन तपासणी होणार असून, सदरील परीक्षेदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये, याकरीता उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांचे भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावर मंडळ अधिकारी, तलाठी यांचे बैठे पथक देखील स्थापन करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस, मोबाईल, स्मार्टवॉच, कॅल्क्युलेटर, हेडफोन, मायक्रोफोन, हीडन कॅमेरा इत्यादी इलेक्ट्रॉनिक्स साहित्य वापरण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे. परीक्षा केंद्रावर नियुक्त करण्यात येणारे पर्यवेक्षक, समवेक्षक हे इतर तालुक्यातील असणार आहेत. तसेच पर्यवेक्षक व समवेक्षक यांना देखील मोबाईल अथवा इतर इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस सोबत बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे. तसेच परीक्षेदरम्यान काही अनुचित प्रकार करणाऱ्या किंवा मदत करणाऱ्या विरुध्द भारतीय नागरिक संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.

# स्व. चिंदाबाई जोगदंडे यांची पुण्यतिथी साजरी



**जालना । प्रतिनिधी -** येथील एम.जी. नाथाणी सिंधी हिंदी विद्यालय व जे. आर. नाथाणी कनिष्ठ महाविद्यायात स्व. चिंदाबाई जोगदंडे यांची २३ वजी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी गरजू विद्यार्थ्यांना दिलीप शिवाजी जोगदंडे यांच्यावतीने वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष गोपीचंद्र सचदेव यांची तर अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक प्रदीप बबनराव देशमुख यांची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्व. चिंदाबाई जोगदंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे गोपीचंद्र सचदेव यांनी स्व. चिंदाबाई जोगदंडे यांच्या विषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर भीमराव गायकवाड यांनी केले. तर आभार दिलीप जोगदंडे यांनी मानले.

प्रसंगी शाळेचे विद्यार्थी-विद्यार्थीनींसह शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राधाकिशन आर्दड आणि हरेश भदणेकर आदींनी परिश्रम घेतले.

# टाटा मुंबई मॅरेथॉन मध्ये धारावी बांद्रातील ज्येष्ठ नागरिक सहभागी होणार!

**धारावी । प्रतिनिधी -** रविवार दिनांक १९जानेवारी२०२५ रोजी आधाता ट्रस्ट सहभागामुळे टाटा मुंबई मॅरेथॉन चालण्याचे स्पर्धेत धारावी सह बांद्रातील ज्येष्ठ नागरिक सहभागी होणार आहेत. धारावीतील हॅप्पीनेस ज्येष्ठ नागरिक संघाकडून. श्री दिलीप गाडेकर, श्री शंकर पोटे,श्री दत्तात्रय सोनवणे,श्री दिलीप नारद, श्री एम वाय शिंदे, श्री मलिकार्जुन अवसरे,श्री गुरुनाथ वैती यांच्यासह बांद्रे पूर्वेकडील अरुणोदय वॉकर्स श्रीमती जयश्री चौधरी श्रीमती सुषमा चुरी,श्रीमती संध्या सातारकर, श्री हरीश कांजी भाई,श्रीमती सुषमा लवेकर,श्री कैलास कांबळे व श्रीमती उषा धातरकर ही ज्येष्ठ मंडळी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. आधातारचे संस्थापक अरुण नंदा सर क्लेरा डिसूजा व कॉर्डिनेटर विठ्ठल शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार धारावी बांद्रातील ग्रुप सहभागी होत आहे ट्रस्ट कडून सहभागी होणाऱ्या लाभार्थ्याला संपूर्ण किट प्राप्त झाले असून मोठ्या उत्साहाने या स्पर्धेत सहभागी होत असल्याची माहिती हॅपिनेस संघाचे दिलीप गाडेकर व अरुणोदय वॉकर्सच्या श्रीमती अंजली रिसबूड यांनी कळविले आहे.नुकत्याच एमआयजी ग्राउंड बांद्रा येथे संपन्न झालेल्या चालण्याच्या स्पर्धेतही या ज्येष्ठ मंडळींनी भाग घेतला होता.

# धाकलगांव ग्रामपंचायतच्या सरपंचपदी उज्वला ढोणे यांची बिनविरोध निवड



**धाकलगांव । प्रतिनिधी -** येथील ग्राम पंचायतच्या सरपंच शिता बळिराम शेडगे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त असलेल्या सरपंच पदासाठी मंगळवारी ग्राम पंचायत धाकलगांव कार्यालयात निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी उज्वला सतिश ढोणे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांनी उज्वला ढोणे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी ग्रामपंचायतं धाकलगांव ग्रामसेवक, माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य व गावकरी उपस्थित होते. सरपंचपदी निवड जाहीर झाल्यानंतर गावकऱ्यांनी वाजत गाजत मिरवणूक काढली. उज्वला ढोणे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गावकऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच उज्वला सतिश ढोणे यांनी दिली आहे.

# यशमंत्र सरकारी नोकरीचा मार्गदर्शन शिबिराचा यशस्वी समारोप

**कांजुरमार्ग -** येथील गाबीत समाज संस्थेच्या वतीने यशमंत्र सरकारी नोकरीचा मार्गदर्शन शिबिर रविवार दि १२ जानेवारी २०२५ रोजी संस्थेच्या कांजुरमार्ग(पुर्व ) येथील गाबीत समाज भवनात उत्साहात पार पडले. या शिबिरात सन्मा. श्री विष्णू बाळ धुरी यांचे विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन लाभले व त्यांनी सरकारी नोकरी संदर्भात विविध विषयांवर माहिती देऊन परीक्षेत यश कसे मिळवावे हे सांगून विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळी सकारात्मक ऊर्जा निर्माण केली.

दहावी पास तसेच पदवीधर विद्यार्थ्यांसाठी आगामी वर्षात येणाऱ्या विविध राज्य सरकारी, केंद्र सरकारी, भारतीय रेल्वे व बँकेतील नोकरी विषयक माहीती व संधी, सरकारी नोकरीचा फॉर्म कधी, कुठे व कसा भरावा ? ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर परिक्षेत यश मिळविण्यासाठी अभ्यास कसा करावा या संबंधी त्यांनी शिबिरात सविस्तर माहिती दिली.

यावेळी गाबीत समाज संस्थेच्या वतीने मार्गदर्शक श्री विष्णू धुरी यांचे आभार मानून त्यांना सन्मानित करण्यात आले . तसेच कार्यक्रमाच्या अखेरीस उपस्थित विद्यार्थ्यांना भेटवस्तू व अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



सदर कार्यक्रमास गाबीत समाज संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच इतर कार्यकर्त्यांनी मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. तसेच या पुढेही विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय गाठण्याकरिता त्यांना चांगल्या विचारांनी प्रेरित करण्यासाठी असे नवनवीन कार्यक्रम आखण्याचा संस्थेचा मानस असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# रानमळा येथे जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपन कार्यक्रम संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** नेहरु युवा केंद्र जालना व संघर्ष बहुदेशीय सेवाभावी संख्या रानमळा यांचा संयुक्त विदयमाने जिल्हा परिषद प्राथमिक माध्यमिक शाळा रानमळा येथे एक पेड माँ के नाम उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या वतीने शाळेत पेरुच्या झाडांची लागवड करण्यात आली. शाळेच्या क्रिडांगणावर मुख्याध्यापक श्री प्रमोद देशमुख, पदवीधर शिक्षक श्री कैलास उबाळे, श्री भगवान खरात, श्री गजानन चिकाळकर, श्री तुकाराम कराळे चांच्यासह संघर्ष संख्येचे अध्यक्ष श्री प्रकाश बुधवंत, कृष्णा बुधवंत श्री दगडूबा टाकरस यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.




**- छत्रपती संभाजीनगर येथील राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव, भा.पो.से.(से.नि.) हे शुक्रवार दि.१७ जानेवारी २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.**

# कांतिज्योती सावित्रीबाई फुले : एक थोर समाजसुधारक - प्रा संभाजी तिडके



**मंठा । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद महाविद्यालयात येथे ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रंसगी मान्यवरांच्या शुभहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

तद्नंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा संभाजी तिडके म्हणाले की, सावित्रीबाई फुले यांनी फक्त शिक्षणाचाच प्रसार केला नाही, तर बालविवाह, सती प्रथा, जातीय विषमता आणि विधवांच्या दुर्दशेविरोधात आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी विशेष आश्रयस्थाने तयार केली, जिथे विधवांना सन्मानाने जगता येईल. त्यांनी स्त्रियांना आपली ओळख आणि स्वाभिमान निर्माण करण्यासाठी प्रेरित केले.

ते पुढे म्हणाले की आजच्या आधुनिक काळातही सावित्रीबाईंचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांनी सुरू केलेल्या चळवळींमुळे आज स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे उघडली गेली आहेत. त्यांचे कार्य केवळ भारतीय समाजापुरते मर्यादित नाही, तर जागतिक स्तरावरही स्त्रियांना त्यांच्या अधिकारांबद्दल जागरूक करण्यासाठी प्रेरणादायी आहे. अशी महत्त्वपूर्ण माहिती प्रमुख वक्ते . प्रा. संभाजी तिडके यांनी दिली तर प्रा डॉ. दक्षता देशामुख यांचेही प्रेरणादायी समायोजित भाषण झाले.

तसेच दिक्षा घुगे, राधिका रामपूरकर , रोहिणी खवणे , प्रिया खरात यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भषण केले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माणिकराव थिटे यांची उपस्थिती होती तर प्रा चारुलता पाटील यांची विचार मंचावर उपस्थिती होती

कार्यक्रमांचे प्रस्थाविक प्रा. डॉ राजेश गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल जाधव यांनी केले कार्यक्रमात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. राजेश गायकवाड , प्रा. के . एम कांबळे , प्रा.डॉ. पांडूरंग नवल , प्रा.डॉ. तुषार धोंडगे प्रा. , प्रा.डॉ. दिपमाला गायकवाड ,प्रा दिप्ती देशमुख कार्यालयीन अधिक्षक श्री दत्तात्रय कडूकर ,मुख्य लिपीक अशोक मुळे व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी रोहीणी खवणे यांनी उपस्थित यांचे आभार व्यक्त केले

# वरफळ जि.प.उर्दू प्राथमिक शाळेत आनंदनगरी मेळावा

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वरफळ येथील जि. प. उर्दू प्राथमिक शाळेत दि.११/०१/२०२५, रोजी आनंद नगरी भरविण्यात आली होती. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विक्री साठी वेगवेगळ्या प्रकारचे अनेक पदार्थ तयार करून विक्री साठी ठेवण्यात आले. शाळेतील आनंद नगरीत विक्री साठी अनेकांचे स्टॅल पाहून त्यांचे पालक अतीशय आनंदी झाले होते.या आनंद नगरीत विविध प्रकारच्या वस्तू खाद्यपदार्थ शोभेच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या पालका कडून देखील या आनंदनगरी मध्ये आनंदाने खरेदी करून आनंदनगरी चा उत्साह वाढविण्यात आला होता.यावेळी कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मौलाना *उमर साहब* यांच्या हस्ते करण्यात आले होते .

शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष, शेख अजहर, समिती सदस्य, प्रमुख पाहुणे सरपंच जुबेर राजाव शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, जि. प.मराठी शाळेचे शिक्षक व विद्यार्थी, नदीम. सय्यद जावेद. कासिम मौलाना. नदीम. मौसम. शेख आयशान यांच्या उपस्थितीत आनंदनगरी उत्साहात साजरी करण्यात आली होती.



# नादखुळा!

## महिला टिम इंडियाचा मोठा विजय



**राजकोट -** आमीर खानचा दंगल चित्रपटातील डायलॉग सिद्ध करुन दाखवत महिला टीम इंडियाने डोळे दिपवणारी कामगिरी केली आहे. 'छोरियाँ छोरों से कम है कै' भारत विरुद्ध आयर्लँड यांच्यातील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडियाने तब्बल ३०४ धावांनी विजय मिळवला. या विजयासह टीम इंडियाने ३-० ने मालिका विजयही मिळवला. कर्णधार स्मृती मंधानाच्या नेतृत्वात भारतीय महिला संघाने नादखुळा फलंदाजी व गोलंदाजी केली. मैदानातील प्रेक्षकांचे पैसे वसुल खेळ करत भारतीय महिला संघाने चक दे इंडिया म्हणत जल्लोष केला. चौकार, षटकारांची आतिषबाजी करत स्मृती मंधाना आणि प्रतिका रावलच्या खेळाने क्रिकेट चाहत्यांची मने जिंकली. त्यामुळेच, टीम इंडियाला ३०४ धावांनी मोठा विजय मिळवता आला. या विजयानंतर संघातील खेळाडूंनी जल्लोष साजरा केल्याचा व्हिडिओ बीसीसीआयने शेअर केला आहे. तर, सोशल मीडियातून टीम इंडियावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

राजकोटमध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाने आज ऐतिहासिक कामगिरी करत जगातील क्रिकेट रसिकांचे लक्ष आपल्याकडे वेधले. जगाच्या महिला क्रिकेटमध्ये यापूर्वी कधीही घडला नव्हता असा खेळ आज राजकोटच्या मैदानावर पाहायला मिळाला. तीन साम न्यांच्या मालिकेतील तिसऱ्या व अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने सर्वोच्च धावसंख्या करून इतिहास रचला. स्मृती मानधना आणि प्रतिका रावल या सलामी जोडीच्या शतकांमुळे भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच एकदिवसीय क्रिकेटम ध्ये ४०० पेक्षा जास्त धावांचा डोंगर रचला होता. यापूर्वी महिला क्रिकेटमधील सर्वो च्च धावसंख्या ३७० होती, तीही याच मालिकेतील १२ जानेवारी २०२५ च्या सामन्यात केली होती. मात्र, अंतिम सामन्यात आपलाच रेकॉर्ड मोडत महिला संघाने ५० षटकांत ४३५ धावांचा डोंगर रचला.

भारताची नवी सलामीवीर प्रतिका रावलने हिने एकदिवसीय क्रिकेटमध्ये पाऊल ठेवताच आपल्या खेळीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. भारत वि आयर्लंड मालिकेत तिने एकापेक्षा एक उत्कृष्ट खेळी केल्या पण तिला शतकापर्यंत पोहोचता आले नाही. पण प्रतिकाने अखेरच्या वनडे सामन्यात ही कसर पूर्ण केली. एकदिवसीय क्रिकेटमधलं पहिलं शतक झळकावताना तिने १५४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या सामन्यातील या उत्कृष्ट खेळीशिवाय प्रतिका रावलने असा पराक्रम केला आहे, जो याआधी जगातील इतर कोणत्याही फलंदाजाला करता आला नाही. तिने ६ वनडे डावांमध्ये विक्रमी धावा केल्या आहेत.

प्रतिका रावलला आयर्लंड मालिकेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी मालिकावीर म्हणून निवडण्यात आले. प्रतिका आता भारतासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक खेळी खेळणारी तिसरी फलंदाज ठरली आहे. दीप्ती शर्माने भारतीय महिला संघासाठी सर्वात मोठी एकदिवसीय खेळी खेळली आहे. तिने २०१७ म ध्ये आयर्लंडविरुद्ध १८८ धावा केल्या होत्या. त्यानंतर २०१७ मध्येच हरमनप्रीत कौरने नाबाद ११ धावांची शानदार खेळी केली होती. आता प्रतिका रावलने १५४ धावा करत तिसरे स्थान मिळवले आहे.

प्रतिका रावलने अवघ्या सहा वनडे सामन्यांमध्ये विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. तिने पहिल्या ६ एकदिवसीय डावात एकूण ४४४ धावा केल्या आहेत. पहिल्या सहा वनडे सामन्यांनंतर कोणत्याही महिला फलंदाजाने केलेल्या या सर्वाधिक धावा आहेत. तिने थायलंडच्या नत्थाकन चँथमला मागे टाकले आहे, ज्याने तिच्या पहिल्या सहा एकदिवसीय सामन्यांमध्ये ३२२ धावा केल्या होत्या. प्रतिकाने वेस्ट इंडिजविरूद्धच्या वनडे मालिकेत भारताकडून पदार्पण केले होते.

कर्णधार मंधानाने ८० चेंडूत १२ चौकार आणि ७ षटकारांसह १३५ धावा केल्या, तर प्रतिका रावलने १५४ धावा ठोकल्या, विशेष म्हणजे तिचा हा ६ वाच एकदिवसीय सामना आहे. या दोन्ही धडाकेबाज फलंदाजांच्या जोरावर भारताने प्रथम फलंदाजी करताना ४३५ धावांचा डोंगर उभारला. मात्र, भारताच्या ४३५ धावांचा पाठलाग करताना आयर्लंडचा संघ अवघ्या १३१ धावांवर तंबूत परतला. ३१.४ षटकांतच आयर्लंडचे सर्व फलंदाज बाद झाले. त्यामुळे, भारतीय संघाला ३०४ धावांनी मोठा विजय मिळाला. दरम्यान, तीन सामन्यांच्या मालिकेतील दमदार कामगिरीमुळे प्रतिका रावलला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर, आजच्या सामन्यातील तडाखेबंद १५४ धावांसाठी तिला वुमेन ऑफ द मॅच पुरस्कारही देण्यात आला.




## श्रीक्षेत्र शेगावला रोटरी इंटरनॅशनलचे वार्षिक अधिवेशन

### जालन्याला पहिल्यांदाच यजमानपदाचा बहुमान



**जालना । प्रतिनिधी -** रोटरी इंटरनॅशनलच्या प्रांत ३१३२ चे वार्षिक अधिवेशन १७ ते १९ जानेवारी दरम्यान श्रीक्षेत्र शेगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. जालना रोटरीच्या ६५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच शहरातील डॉ. सुरेश साबु यांना प्रांतपालपद मिळाले असून, यामुळेच जालन्याला या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद प्राप्त झाले आहे. हा जालन्याच्या रोटरी परिवारासाठी दुग्धशर्करा योग आहे.

अधिवेशनाचे उदघाटन १७ जानेवारी रोजी बंगलोर प्रांताचे माजी प्रांतपाल श्रीनिवास मूर्ती यांच्या हस्ते होणार आहे. या तीन दिवसीय अधिवेशनात विविध क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अंटार्टिका अभ्यास दौरा केलेल्या मधुबाला जोशी या तेथील सांस्कृतिक वातावरण, समाजकारण, शिक्षण पद्धती या विषयांवर आपले विचार व्यक्त करतील. तसेच ज्येष्ठ समाजसेवी प्रकाश आमटे आणि मंदाकिनी आमटे यांची मुलाखत अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. याशिवाय, रोटरी इंटरनॅशनलचे संचालक राजू सुब्रमण्यम, पुण्याचे माजी प्रांतपाल पंकज शाह, ब्रह्माकुमारींच्या सुनीता दीदी आणि राजदीदी मोदी यांचे उद्बोधनही होणार आहे.

१९०५ मध्ये स्थापन झालेली रोटरी ११९ वर्षांचा गौरवशाली इतिहास लाभलेली संस्था आहे. जगभरात शांतता प्रस्थापित करणे, आरोग्यसेवा, शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि पोलिओ निर्मूलन यांसारख्या कार्यांत रोटरीने भरीव योगदान दिले आहे.

६५ वर्षांपूर्वी जालना शहरात रोटरीची स्थापना झाली. ६५ वर्षानंतर प्रथमच डॉ. सुरेश साबु यांच्या रूपाने जालन्याला प्रांतपालपद मि ळाल्याने या अधिवेशनाचे आयोजन करण्याची संधी जालना रोटरी परिवाराला मिळाली आहे. राष्ट्रीय अधिवेशनाचे यजमानपद मि ळणे हा जालन्यासाठी मोठा गौरव आहे.

या अधिवेशनाचा उद्देश रोटरीच्या कार्याला व्यापक स्वरूपात पुढे नेणे, नवीन कल्पना संकलित करणे, परस्पर संवाद साधणे, सम ाजोपयोगी उपक्रम आखणे आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या क्लब व सदस्यांना प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करणे आहे.

अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष संयोजन समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष हरीश मोटवानी, उपाध्यक्ष घनश्यामदास गोयल, संयोजक अरुण अग्रवाल, सहसंयोजक अनुप करवा, सचिव राजेश सोनी, सहसचिव सुनील बजाज, आर्थिक सल्लागार प्रम ोद झांजरी व वेणूगोपाल राव, सदस्य डॉ. नितीन खंडेलवाल, केदार मुंदडा, विवेक मणियार, सुमित्रा गादीया, गौरव करवा यांनी आयोजनात मोलाची भूमिका बजावली आहे.

या अधिवेशनात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन., रोटरीच्या सामाजिक, आरोग्य व पर्यावरणविषयक उपक्रमांची विस्तृत चर्चा., नावीन्यपूर्ण उपक्रमांची आखणी व त्यासाठीच्या धोरणांवर भर., चांगले काम करणाऱ्या क्लब व सदस्यांचा गौरव व सन्मान होणार आहे.

रोटरी इंटरनॅशनल प्रांत ३१३२ चे हे वार्षिक अधिवेशन जालन्यासाठी अभिमानाचा क्षण असून, या निमित्ताने रोटरीच्या उद्दिष्टांची नवी दृष्टी साकारली जाईल. समाजसेवेचा वसा अधिक व्यापक करण्यासाठी ही संधी जालन्याला प्रेरणादायी ठरेल. या अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी प्रांतपाल डॉ. सुरेश साबु व त्यांच्या टीमने विशेष प्रयत्न केले असून, ते जालन्यासाठी ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## जालना जनसेवा ग्रुपचा भाविकांच्या सेवेत सात दिवस मोफत चहाचा प्रेरणादायी उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील नवीन मोंढा रोडवर ब्रजधाममध्ये १८ ते २४ जानेवारीदरम्यान गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या मुखारविंदातून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून, थंड हवामान लक्षात घेऊन भक्तांसाठी दुपारी ४ ते ५ या वेळेत जालना जनसेवा ग्रुप, विक्रम टी कंपनी यांच्यावतीने भक्तांसाठी सात दिवस मोफत गरमागरम चहा सेवेचा प्रेरणादायी उपक्रम राबविला जाणार आहे. ही सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने देण्यात येणार आहे.



भागवत कथा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो आध्यात्मिक शांती व समाजाला एकत्र आणणारा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. यासह, मोफत चहाची सेवा हा एक समर्पण आणि सामाजिक जबाबदारीचा उत्तम नमुना आहे. श्रद्धेच्या प्रवासात मोफत चहाची उर्जादेखील मिळणार आहे.

भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा आणि सोहळ्यात सहभागी होऊन अध्यात्मिक आनंदाची अनुभूती घ्यावी, असे आवाहन जालना जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, उपाध्यक्ष सुनील लाहोटी, सचिव डॉ. रामनारायण जयस्वाल, कोषाध्यक्ष गोवर्धन अग्रवाल, विक्रम टी चे चेअरमन रमेशभाई पटेल, व्यवस्थापकीय संचालक भावेश पटेल, प्रकल्प प्रमुख सूर्यनारायण गजबी आणि जितेंद्र अग्रवाल यांनी केले आहे.

## मकोका कारवाईला विरोध करून गुन्हेगारांचे समर्थन करत मा. न्यायालयाचा अवमान करणारे तसेच मनोज जरांगे यांच्यासह लोकप्रतिनिधींच्या छायाचित्राची विटंबना करणाऱ्यां वर करवाई करा

### सकल मराठा समाज परतूरची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड तसेच मस्साजोग जि. बीड येथील सरपंच कै. संतोष देशमुख यांच्या निघृण व अमानवीय हत्ये मधील खुनी आरोपींवर तपास यंत्रणा यांनी योग्य तो तपास करून मा. न्यायालयाने काल ज्या आरोपींच्या मकोका कारवाईला विरोध केला. या मधील सर्व गुन्हेगारांचे सम र्थन करुन मा. न्यायालयाने दिलेल्या निकालाचा वाल्मिक कराड यांच्या समर्थकांनी अवम ान केला. या मध्ये परळी सह अनेक ठिकाणी रास्ता रोको, जाळपोळ, बंद व मनोज जरांगे पाटील यांच्या सह आ. सुरेश धस, आ. संदीप क्षीरसागर, आ. जितेंद्र आव्हाड व सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या छायाचित्राला काळे फासून विटंबना करून जाणीवपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न वाल्मिक कराड यांच्या सम र्थकांकडून करण्यात आला. त्याबद्दल या सर्व घटनेचा सकाल मराठा समाज परतूर तालुक्याच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला.

शहरातील महादेव मंदिर चौक येथे बुधवारी दुपारी १२ वाजता मराठा समाजाचे दैवत, संघर्ष योद्धा मा. मनोज जरांगे पाटील व वरील सर्व लोकप्रतिनिधी सह सामाजिक कार्यकर्त्या यांच्या छायाचित्रास दुग्धाभिषेक घालून अमर रहे, अमर रहे संतोष अण्णा देशमुख अमर रहे, खंडणी सह हत्ये म धील आरोपींना फाशी झालीच पाहिजे, देशमुख कुटुंबाना न्याय मिळाच पाहिजे, जरांगे पाटील तुम आज बढो, धस आण्णा, संदीप भैय्या, आव्हाड साहेब, दमाणी ताई तुम आगे बढो आधी घोषणा देऊन निषेध व्यक्त करण्यात आला.

काल घडलेल्या प्रकरणातील समाजकंटका वर योग्य ती कार्यवाई व्हावी. मा. न्यायालयाने मकोका अंतर्गत कार्यवाई केल्याने वाल्मिक कराड यांच्या समर्थकांनी काल परळी वैद्यनाथ शहर बंद करून आंदोलन केले. एकप्रकारे कराड यांच्या समर्थकांनी मा. न्यायालयाचा अवमान केला. तसेच त्यांनी मराठा समाजाचे दैवत मा.संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आणि ईतर तीन लोक प्रतिनिधींच्या छायाचित्रांची विटंबना केली. दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न काही लोकांचा आहे. त्यामुळे सरकार व प्रशासनाने वेळीच अशा समाजविघातक समाजकंटकावर प्रतिबंधात्मक कार्यवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल. अशा आशयाचे निवेदन उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्री याना दिले.



अतीशय असंविधानिक पद्धतीने आणि वारंवार तेढ निर्माण करणारी कृत्ये, वक्तव्य करणारांवर तात्काळ गुन्हे दाखल झाले पाहिजेत. परळी, बीड सह महाराष्ट्र राज्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या सम ाजकंटकांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करुन योग्य ती कार्यवाई करावी अशी मागणी यावेळी एकनाथ कदम, महेश नळगे, नामदेव धुमाळ, रमेश डाके यांनी मनोगतात व्यक्त केली.

निवेदनावर लक्ष्मण गावडे, भाऊसाहेब पा. मुके, निलेश चव्हाण, संदीप कदम, योगेश मोगल, शुभम कठोर, पवन सुरुंग,नागेश पवार प्रवीण तौर, पवन अंभुरे, रोहित अग्रवाल, ज्ञानेश्वर केवारे, दत्त अंभुरे, परमेश्वर बिल्हारे, रवींद्र शिंदे, सचिन खरात, विठ्ठल काळदाते, माउली लहाने, विकास खरात, गोविंद पंढरपोटे, दीपक कदम, आबासाहेब कदम, सुदर्शन सोळंके, दत्ता सुरुंग, आबासाहेब वाटाणे, गजानन वटाणे सह अनेक मराठा व इतर समाजबांधवांच्या साह्य आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.